मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दि. 25 ऑक्टोबर 2024 | पान- 1

# भोसरीमध्ये मोठी दुर्घटना पाण्याची टाकी कोसळून 2 जणांचा मृत्यू

## विधानसभा निवडणुकांची धामधूम सुरू असताना : पिंपरी चिंचवडमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे.



**पिंपरी | प्रतिनिधी**

एकीकडे विधानसभा निवडणुकांची धामधूम सुरु असताना दुसरीकडे पिंपरी चिंचवडमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. शहरात पाण्याची टाकी कोसळून २ कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. पिंपरी चिंचवडमधील भोसरीतील सदगुरु नगर या ठिकाणी ही धक्कादायक घटना घडली आहे. सध्या या ठिकाणी रेस्क्यू ऑपरेशन सुरु करण्यात आले आहे. सध्या अग्निशमन दलाचे कर्मचारी आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पिंपरी चिंचवड परिसरातील भोसरीच्या सदगुरु नगर या ठिकाणी असलेली एक पाण्याची टाकी कोसळली. या ठिकाणी लेबर कॅम्पमधील काही कामगार राहत होते. बिल्डरने तकलादू पद्धतीने ही पाण्याची टाकी उभारली होती, असा आरोपही नागरिकांनी केला आहे. आज सकाळी साधारण ७ च्या दरम्यान ही पाण्याची टाकी कोसळून मोठी दुर्घटना घडली.

### जखमींवर रुग्णालयात उपचार सुरु

» या टाकीच्या ढिगाऱ्याखाली अनेकजण अडकल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. तसेच या घटनेत चार कामगारांचा मृत्यू झाला आहे. तर काही कामगार जखमी झाले आहेत. या दुर्घटनेची माहिती मिळताच पिंपरी चिंचवडमधील अग्निशमन दल आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. सध्या हा ढिगारा हटवून जखमींना बाहेर काढले जात आहे. तसेच सध्या जखमींना रुग्णालयात दाखल केले जात आहे. पण या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कामगारांचे मृतदेह काढण्यास नातेवाईकांडून विरोध दर्शविला जात आहे.

> उभारल्या गेलेली पाण्याची टाकी पिंपरी चिंचवड महापालिकेची नव्हती, मात्र घटनेचं गांभीर्य लक्षात घेऊन संपूर्ण चौकशी केली जाईल .
> - शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

---

## शक्तीप्रदर्शनाने आमदार सुनील शेळके उमेदवारी अर्ज दाखल

### तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो समर्थक दाखल



**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळचे आमदार सुनील शेळके हे राष्ट्रवादी काँग्रेस भाजप शिवसेना आरपीआय स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार म्हणून आज (गुरुवारी) हजारो समर्थकांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

उमेदवारी अर्ज दाखल करताना वडगावमध्ये शेळके समर्थकांकडून प्रचंड शक्ती प्रदर्शन होणार आहे. मावळ तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून त्यांचे समर्थक वडगाव मध्ये दाखल होण्यास प्रारंभ झाला आहे. यावेळी गर्दीचा नवा उच्चांक स्थापित होईल, असा विश्वास आमदार शेळके यांच्या निकटवर्तीयांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

आमदार शेळके हे वडगाव चे ग्रामदैवत असलेल्या श्री पोटोबा महाराजांचे दर्शन घेऊन मिरवणुकीने तहसीलदार कार्यालयाकडे जातील. उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी ते उपस्थित जनसमुदायाशी संवाद साधणार आहेत.

वडगाव मावळ येथे उमेदवारी अर्ज भरताना होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेऊन पोलीस खात्याने शहरात सर्वत्र कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे. मोठ्या संख्येने पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

## विनापरवाना फटाका स्टॉलवर महापालिकेची नजर

### अग्निशामक विभाग,आठही क्षेत्रीय कार्यालयांकडून स्टॉलसाठी परवानगी देण्यात येत आहे.



**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेचा अग्निशामक विभाग आणि आठही क्षेत्रीय कार्यालयांकडून फटाका स्टॉलसाठी परवानगी देण्यात येत आहे. आतापर्यंत ६० व्यावसायिकांनी परवानगी घेतली आहे. विनापरवाना फटाके स्टॉलवर कारवाईचा इशारा अग्निशामक विभागाने दिला आहे. परवानगी घेऊनच स्टॉल उभारण्याचे आवाहन महापालिकेने केले.

दिवाळीचा सण काही दिवसांवर आला आहे. फटाके विक्रेत्यांची लगबग सुरू आहे. शहरात दर वर्षी अनेक स्टॉल परवानगी न घेताच उभारले जातात. परंतु, यंदा महापालिकेने कडक धोरण राबविण्याचा निश्चय केला आहे. फटाका स्टॉलसाठी महापालिकेच्या अग्निशामक विभाग आणि आठही क्षेत्रीय कार्यालयांकडून दोन हजार रुपये शुल्क आकारून परवानगी देण्यात येत आहे.

( उर्वरित पान २ वर )

## सीमा सावळे, काळूराम पवार, सुलक्षणा धर यांच्याकडून अर्जांची खरेदी..

### निवडणूक कार्यालयाकडून अखेर 130 अर्जांची विक्री...



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने आज गुरुवारी (दि. २४) रोजी विहित वेळेत तिस-या दिवशी एकुण ९ व्यक्तींनी एकुण २३ नामनिर्देशन अर्जांची खरेदी केली आहे.

दरम्यान अखेर एकुण ६३ व्यक्तींनी एकुण १३० नामनिर्देशनपत्रं विकत घेतले असुन एका उमेदवाराने एक नामनिर्देशन पत्र निवडणूक कार्यालयात दाखल केले आहे.

नामनिर्देशन पत्रे घेणाऱ्या व्यक्तींची नावे व त्यांनी नोंदविलेल्या माहितीचा तपशील :- सावळे सिमा राजेंद्र, काळूराम मारुती पवार, अजय सुधाकर गायकवाड, प्रतिक्षा अर्जुन कांबळे (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस), डॉ.मनिषा सुमंत गरुड (गायकवाड) (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस), सुरेश हरिभाऊ भिसे, सुलक्षणा राजू धर (राष्ट्रवादी कॉंग्रेस,शरदचंद्रजी पवार), लक्ष्मण (दादा) आत्माराम शिरोळे (रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया आठवले गट), रीता प्रकाश सोनवणे, यांनी एकुण २३ नामनिर्देशन अर्ज नेल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना यादव यांनी कळविले आहे. तसेच आज अखेर एकुण ६३ व्यक्तींनी एकुण १३० नामनिर्देशन पत्रे विकत घेतली असुन एका उमेदवाराने एक नामनिर्देशन पत्र दाखल केले आहे.

# भोसरी-आळंदी रस्त्यावर वाहतूक कोंडीने गुदमरतोय श्वास

## भोसरी-आळंदी रस्त्यावर वाहनाची प्रचंड गर्दी, अतिक्रमण कारवाईकडे महापालिकेचे दुर्लक्ष

**पुणे | प्रतिनिधी**

भोसरी-आळंदी रस्त्यावर वाहनांची प्रचंड गर्दी होत आहे. दिवाळीच्या सणांमुळे रस्त्यावर दुकानासमोर दुतर्फा वाहने लावली जात आहे. या रस्त्यावरील अतिक्रमणाचे प्रमाणही लक्षणीयरीत्या वाढले आहे. त्यामुळे भोसरी-आळंदी रस्ता चौकापर्यंत सुमारे एक किलो मीटर अंतरावर सुमारे अर्धा-एक तास वेळ लागत आहे. या रस्त्यावर दोन्ही बाजूला हातगाडी, पथारीवाले, टू-व्हीलर, फोर व्हीलर वाहने रस्त्यावर लावली जात असल्याने नागरिकांसह वाहनचालक हैराण होत आहे. दरम्यान, या रस्त्यावरचे वर्षानुवर्षे अतिक्रमण काढले जात नाही, रस्ता रुंदीकरणही केले जात नसल्याने नागरिकांना कित्येक वर्षांपासून त्रास सहन करावा लागत आहे.

भोसरी-आळंदी रस्त्यावर सकाळ आणि संध्याकाळ वाहनांची प्रचंड गर्दी होत असते. या मार्गावरुन दररोज कित्येक नागरिक प्रवास करतात. या रस्त्यावरील बनाचा ओढा ते भोसरी-आळंदी रस्ता चौकापर्यंत सुमारे एक किलोमीटरच्या अंतरासाठी अर्धा-एक तास वेळ लागत आहे. या रस्त्यावर ठिकठिकाणी हातगाडी, पथारीवाले आहेत. त्याचप्रमाणे रस्त्याच्या दुतर्फा वाहनेही लावली जातात. पादचारीही रस्त्यावर असल्याने वाहनांची कोंडी होत आहे.



### अतिक्रमणांवर कारवाई कधी?

» भोसरी-आळंदी रस्त्यावर महापालिकेने यापुर्वी सम-विषम पार्किंगचे नियोजन केले होते. हे नियम मोडणाऱ्यांवर वाहनचालकांवर कारवाई करणे गरजेचे आहे. पण कोणतीही कारवाई केलेली नाही. रस्त्याच्या कडेला असणाऱ्या हातगाडी, पथारीवाल्यांचे अतिक्रमण हटविणे आवश्यक आहे. पदपथ पादचाऱ्यांसाठी मोकळा करणे गरजेचा आहे. भोसरी-दिघी रस्ता चौक, चांदणी चौक येथे सायंकाळी वाहतूक पोलिसांची नियुक्ती करणे, पीएमटी चौक, भोसरी-आळंदी रस्ता चौक व चांदणी चौकात नो पार्किंग असणा-या वाहने लावणा-यावर कारवाई करणे गरजेचे आहे.

### रस्त्यावर वाहनांच्या रांगा

» आळंदी रस्त्यावरील कोंडीचा परिणाम पुणे-नाशिक महामार्गाच्या सेवा रस्त्यावरही होतो. भोसरी-आळंदी रस्ता चौकात आळंदी रस्त्याने वळणाऱ्या वाहनांची कोंडी या चौकात झालेली असते. त्यामुळे या सेवा रस्त्यावर कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृह चौक ते चांदणी चौकापर्यंतच्या रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागलेल्या असतात.

“ भोसरी-आळंदी रस्ता चौकात रिक्षासह इतर खासगी प्रवासी वाहने रस्त्यातच थांबवली जातात. त्यामुळे या रस्त्यावर वळणाऱ्या वाहनांना आणि मोशीकडे जाणाऱ्या वाहनांना अडथळा होतो. त्यामुळे वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या वाहनांवर कारवाई होणे गरजेचे आहे. दुकानदारांनी केलेले पदपथावर अतिक्रमण, रस्त्याच्या दुर्तफा लावलेल्या वाहनांवर कारवाई करायला हवी..

- विजय गायकवाड, वाहनचालक.

भोसरीतील आळंदी रस्त्यावर महापालिकेकडून सम-विषम पार्किंगचे नियोजन केले होते. मात्र, या ठिकाणी दररोज रस्त्याच्या दुतर्फा आडवी-तिडवी वाहने लावली जातात. रस्त्याच्या कडेला हातगाडीवाले आणि पथारीवाले ठाण मांडून बसलेले असतात. आळंदी रस्त्यावर भोसरीतील मुख्य बाजारपेठ असल्याने या ठिकाणी येणाऱ्या ग्राहकांची संख्या मोठी आहे. येथील पदपथही अरुंद असून, काही ठिकाणी दुकानदारांनी अतिक्रमण करत काही वस्तू विक्रीच्या वस्तू पदपथावर ठेवल्या आहेत. त्यामुळे ग्राहक आणि नागरिकांना मुख्य रस्त्यावरून चालावे लागत आहे.

---

# पुन्हा पाणीपुरवठा बंद, ऐन निवडणूकीत नागरिकांना त्रास

## रतन टाटा यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी चिंचवड, सायन्स पार्क येथे आयोजित केलेल्या श्रद्धांजली सभेत ते बोलत होते

**पुणे | प्रतिनिधी**

महानगरपालिकेने शहरातील विविध जलकेंद्राची देखभाल दुरुस्तीकरण्यासाठी गेल्या गुरुवारी शहराचा पाणीपुरवठा बंद ठेवला होता. त्यानंतर अद्याप शहराला पाणीपुरवठा सुरळीत करण्यात पाणीपुरवठा विभागाला यश आले नसताना शनिवारी (दि. २६) रोजी रामटेकडी भागातील पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. महापालिकेने ऐन निवडणूकीत देखभाल दुरुस्तीची कामे काढून शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत केला आहे. त्यामुळे नागरिकांकडून संताप व्यक्त केला आहे.

लष्कर पाणीपुरवठा केंद्रातील अत्यावश्यक देखभाल दुरुस्तीचे काम केले जाणार आहे. परिणामी शनिवारी (दि.२६) पाणीपुरवठा बंद ठेवला जाणार आहे. या दुरूस्तीच्या कामामुळे रामटेकडी टाकीला पाणी पोहोचवणाऱ्या पंपिंग लाइनवर परिणाम होणार आहे. परिणामी दिवसभर पाणीपुरवठा बंद राहणार **असल्याची पाणीपुरवठा विभागाने दिली आहे. नागरिकांना नियोजन करुन पाण्याचा साठा करावा, तसेच पाणी जपून वापरावे असे आवाहन केले आहे.**



### या भागात राहणार पाणीपुरवठा बंद...

» रामटेकडी, रामटेकडी इंडस्ट्रीयल एरिया, सय्यदनगर, हेवनपार्क, गोसावी वस्ती, शंकर मठ, वैदुवाडी, रामनगर, आनंदनगर, संपूर्ण मुंढवा, मगरपट्टा, हडपसर आकाशवाणी, संपूर्ण साडेसतरानळी, केशवनगर, हडपसर गावठाण, सातववाडी, गोंधळे नगर, ससाणे नगर, काळेपडळ, शिंदे वस्ती, भीमनगर, मिलिंद नगर, भारत फोर्ज, महंमदवाडी गाव, तरवडेवस्ती, कृष्णा नगर, राजीव गांधीनगर, एन.आय.बी.एम. रोड, पोकळेमळा, परागेनगर, उंड्री रोड. परिणामी पाणीपुरवठा बंद राहणाच्या भागात दुसऱ्या दिवशी उशिरा व कमी दाबाने पाणी पुरवठा होण्याची शक्यता आहे. या भागातील पाणीपुरवठा दिवसभर बंद राहणार असल्याची पाणीपुरवठा विभागाने दिली आहे. नागरिकांना नियोजन करुन पाण्याचा साठा करावा, तसेच पाणी जपून वापरावे असे आवाहन केले आहे.

---

# विनापरवाना फटाका स्टॉलवर महापालिकेची नजर

**पिंपरी | प्रतिनिधी**

( पान १ वरून )

अग्निशामक विभागाकडून बांधकाम आणि शटर असलेल्या गाळ्यांमध्ये स्टॉल उभारण्यासाठी ना हरकत दाखला दिला जातो. तसेच, मोकळ्या जागेवर परवानगी दिली जात नसल्याचेही अग्निशामक विभागाकडून सांगण्यात आले. फटाका स्टॉलसाठी महापालिकेच्या अग्निशामक विभाग आणि आठही क्षेत्रीय कार्यालयांकडून दोन हजार रुपये शुल्क आकारून परवानगी देण्यात येत आहे.

शहर परिसरातून फटाका स्टॉल उभारण्यासाठी ६० जणांनी अर्ज केले होते. त्यांना अग्निशामक विभागाने परवानगी दिली आहे. बेकायदा फटाका स्टॉल उभारल्यास क्षेत्रीय कार्यालयाच्या अतिक्रमण विभागातर्फे कारवाई करण्यात येणार आहे. आगीच्या घटना टाळण्यासाठी स्टॉलशेजारी वाळू ठेवावी. फटाका स्टॉल परिसरात बिडी, सिगारेट पेटवू नये, ज्वलनशील पदार्थ ठेवू नये, स्टॉलपासून लहान मुलांना दूर ठेवावे. पाण्याची व्यवस्था ठेवावी, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

अग्निशामक विभागाने दोन हजार रुपये परवानगी शुल्क आकारून ६० फटाका स्टॉलधारकांना परवानगी दिली आहे. व्यावसायिकांनी परवानगी घेऊनच स्टॉल उभारावा अन्यथा कारवाई केली जाईल, असे पिंपरी-चिंचवड महापालिकेचे उपायुक्त मनोज लोणकर यांनी सांगितले.

# ड्रायव्हिंग स्कूलचालकांच्या तपासणीकडे होतेय दुर्लक्ष

## थकीत कर, वाहनांचे इ-चलन काढणाऱ्या आरटीओला मिळेना वेळ, सप्टेंबर 2022 नंतर कार्यवाही नसल्याचे झाले उघड

**पिंपरी | प्रतिनिधी**

वाहनांचे थकीत कर, योग्यता तपासणी प्रमाणपत्र, इ चलन हे आवर्जून तपासणाऱ्या आरटीओला ड्रायव्हिंग स्कूल चालकांच्या तपासणीसाठी वेळ मिळत नसल्याचे दिसून आले.दरवर्षी ड्रायव्हिंग स्कूल्सची तपासणी करणे आवश्यक आहे. तपासणी होत नसल्याने परिणामी वाहन चालवण्याचे जेमतेम प्रशिक्षण देऊन चालकांना रस्त्यावर उतरवले जात असल्याची शक्यता आहे.

वाहनांचे थकीत कर, योग्यता तपासणी प्रमाणपत्र, इ चलन हे आवर्जून तपासणाऱ्या आरटीओला ड्रायव्हिंग स्कूल चालकांच्या तपासणीसाठी वेळ मिळत नसल्याचे दिसून आले.दरवर्षी ड्रायव्हिंग स्कूल्सची तपासणी करणे आवश्यक आहे. तपासणी होत नसल्याने परिणामी वाहन चालवण्याचे जेमतेम प्रशिक्षण देऊन चालकांना रस्त्यावर उतरवले जात असल्याची शक्यता आहे.



### केवळ दोघांवर कारवाई ?

» प्रादेशिक परिवहन कार्यालय अंतर्गत दर्जा वाढवल्यानंतर बोगस ड्रायव्हिंग स्कूलचालक सापडले होते. त्या अनुषंगाने एकावर कारवाईही केली होती. तर, अन्य एकाला सक्त ताकीद दिली होती. मात्र त्यानंतर त्या अनुषंगाने तपासणी करण्यात आली नसल्याची दिसून येते. परिणामी, एजंटाच्या माध्यमातून अर्जदारांना फसवण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तत्पूर्वी बोगस आणि अवैध्य अशा ड्रायव्हिंग स्कूल चालकांवर कारवाई करण्याची मागणी न्यू पिंपरी-चिंचवड मोटर ड्रायव्हिंग स्कूल असोसिएशननेही केली होती.

रस्ता सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून मोटार वाहन ड्रायव्हिंग स्कूलच्या माध्यमातून चांगल्या दर्जाचे चालक निर्माण होण्यासाठी त्यांना राज्य परिवहन विभागाने श्रेणी पद्धत लागू केली आहे. पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालय अंतर्गत २३२ नोंदणीकृत ड्रायव्हिंग स्कूल आहेत. शाळेची प्रशिक्षण देण्याची पद्धती कशी आहे, या सर्व बाबींची तपासणी झाल्यानंतर संस्थेला शंभर गुण मिळणे आवश्यक आहे. जर तपासणीमध्ये पन्नासपेक्षा कमी गुण मिळाले असतील, सहा महिन्यांत त्यांच्यात सुधारणा झाली नाही तर त्यांचे प्रमाणपत्र रद्द करण्याचा अधिकार आरटीओ अधिकाऱ्यांना आहे. या संस्थांचा दर्जा कायम राहण्यासाठी प्रादेशिक परिवहन अधिकारी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हे दर सहा महिन्यांतून या संस्थांना अचानक भेटी देऊन त्याचे अहवाल परिवहन आयुक्त कार्यालयास त्याच दिवशी ई-मेल किंवा फॅक्सद्वारे सादर करणे अनिवार्य आहे. मात्र, गेल्या दोन वर्षांपूर्वी करण्यात आलेल्या तपासी नंतर पुन्हा तपासणी झाली नसल्याचे दिसून आले आहे. या दोन वर्षांमध्ये गल्ली बोळात तसेच, आरटीओ कार्यालायलगत मोठ्या प्रमाणात ड्रायव्हर स्कूल स्थापन झाले आहेत. त्यामुळे त्यांची तपासणी करणे अनिवार्य असताना गेल्या दोन वर्षापासून ती तपासणी झाली नसल्याचे दिसून येत आहे.

प्रत्यक्षात तपासणी केल्यानंतर विविध सुविधांची पाहणी केल्यानंतरच त्यांना गुण देण्यात येतात. त्यात संस्थेसाठी प्रशस्त जागा, क्लासरूम आणि प्रसाधनगृह, फर्निचर, वाचनालय, दृकश्राव्य साहित्यासाठी २० गुण, वाहनांची स्थिती प्रशिक्षणादरम्यान वाहनाची सर्वसाधारण माहिती उमेदवाराला होण्यासाठी आवश्यक असलेल्या मॉडेलसाठी २० गुण, प्रशिक्षण देण्याची क्षमता, चालवण्याचा पाच वर्षांचा अनुभव यासाठी २५ गुण आहेत. प्रशिक्षणार्थींना अतिरिक्त सुविधा दिल्या जातात किंवा नाहीत याबाबत प्रशिक्षणार्थीकडून माहिती घेऊन १० गुण अशा पद्धतीने त्याची श्रेणी ठरली जाते. ७५ पेक्षा अधिक गुण असलेल्याला अ श्रेणी, ६० ते ६५ या दरम्यान ब श्रेणी तर त्यापेक्षा कमी असलेल्या ड्रायव्हिंग स्कूल क श्रेणी देण्यात येते.

> **महापालिका शाळांना बस सेवा नाहीत. खाजगी शाळांना त्या सेवा आहेत. त्यामुळे परिवहन आणि बस बाबतवर लक्ष ठेवण्यास आरटीओ आहे. राज्य शासनाने याबाबतच्या काही मार्गदर्शक तत्वे दिलेले आहेत ते सर्व शाळांपर्यंत आम्ही पोचवत आहोत.**
>
> **- विजय थोरात, सहाय्यक आयुक्त,शिक्षण विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# प्रतिज्ञापत्रासाठी शंभरऐवजी मोजावे लागणार पाचशे

## सामान्यांच्या खिशाला कात्री : स्टॅम्प पेपरबाबतच्या निर्णयाने नागरिकांमध्ये नाराजी

**पिंपरी | प्रतिनिधी**

विविध शासकीय योजना, शैक्षणिक क्षेत्रातील योजना यांचे लाभ घेण्यासाठी, तसेच जमीन विषयक कागदपत्रे, विविध दाखले – प्रमाणपत्रे काढण्यासाठी सामान्य नागरिकांना प्रतिज्ञापत्र सादर करावे लागतात.

हेच प्रतिज्ञापत्रक बनविणे आता महागले आहे. यापुढे प्रतिज्ञापत्रासाठी शंभर रुपयांच्या स्टॅम्प पेपर ऐवजी थेट ५०० रुपयांचा स्टॅम्प पेपर नागरिकांना खरेदी करावा लागणार आहे. शासकीय शुल्कात चौपट वाढ केल्याने सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लागणार आहे.

शासनाने राजपत्र प्रसिद्ध करून दि.१४ ऑक्टोबरपासून या वाढीची अंमलबजावणी सुरु केल्याचे जाहीर केले. त्यामुळे आता प्रतिज्ञापत्र करण्यासाठी थेट चौपट म्हणजे ५०० रुपये मोजावे लागणार आहेत. १००, २००, ३०० रुपयांच्या स्टॅम्पवर करण्यात येणारे दस्त शासनाने बंद करून थेट शंभरऐवजी ५०० रुपयांचा स्टॅम्प पेपर नागरिकांना खरेदी करावा लागणार आहे.

पूर्वी सामान्य नागरिकाला कुठलेही शासकीय, निमशासकीय काम करीत असताना शंभर रुपयांचा स्टॅम्प पेपर हा प्रतिज्ञापत्र, करारनामा करिता लागत होता.

परंतु यात वाढ झाली. पाचशे रुपयांचा स्टॅम्प पेपर केल्याने याचा सर्वाधिक फटका विद्यार्थ्यांना बसणार आहे. त्यामुळे शासनाने १०० रुपयांऐवजी ५०० रुपयांचा बॉण्ड करण्याबाबत घेतलेला निर्णय त्वरित रद्द करावा, अशी मागणी नागरिक करीत आहेत.




### इथे हवा असतो स्टॅम्प पेपर...

» दहावीपासून पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्वच प्रतिज्ञापत्र हे शंभर रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर करावे लागत होते. ते आता पाचशे रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर करावे लागणार आहेत.. विविध भाडे करार, गॅप प्रमाणपत्र, जात पडताळणी, नाव दुरुस्त, विसर पावती, घटस्फोट, अन्यप्रकारचे करारनामे व जे शासकीय दस्त पूर्वी १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर केले जात होते, तेही आता पाचशे रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर करावे लागणार आहेत.

# चिंचवड, भोसरी, पिंपरीतून 58 व्यक्तींनी नेले 110 उमेदवारी अर्ज

## विधानसभा निवडणुकीसाठी मतदारसंघाच्या निवडणूक कार्यालयातून उमेदवारी अर्ज नेले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीसाठी आज बुधवारी (दि. २३) दिवसभरात चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक कार्यालयातून २३ व्यक्तींनी ४५ उमेदवारी अर्ज नेले. तर, भोसरी विधानसभा निवडणूक कार्यालयातून १० व्यक्तींनी १७ उमेदवारी अर्ज नेले.

पिंपरी मतदार संघातून २५ व्यक्तींनी ४८ उमेदवारी अर्ज घेतले. चिंचवड, भोसरी आणि पिंपरी मतदार संघाच्या निवडणूक कार्यालयातून अनेक व्यक्तींनी उमेदवरी अर्ज घेतले असले तरी अद्याप एकाही इच्छुकाने आपला उमेदवारी अर्ज दाखल केलेला नाही.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाद्वारे निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे.

त्यानुसार निवडणुकीची अधिसूचना २२ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिद्ध झाली असून उमेदवारांचे उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे.

त्यानुसार चिंचवड विधानसभेसाठीच्या थेरगाव 'ग' क्षेत्रीय कार्यालयातून आज बुधवारी दिवसभरात २३ उमेदवारी अर्ज नेली आहेत. आतापर्यंत ३७ व्यक्तींनी तब्बल ८० उमेदवारी अर्ज नेली आहेत.

भोसरी विधानसभा मतदार संघातील निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयातून आज दिवसभरात १० व्यक्तींनी १७ उमेदवारी अर्ज नेली आहेत. मंगळवारी (दि. २२) १४ व्यक्तींनी २५ उमेदवारी अर्ज नेली आहेत.

त्यामुळे दोन दिवसांत २४ व्यक्तींनी घेऊन गेलेल्या उमेदवारी अर्जांची संख्या आता ४२ झाली आहे. तर, पिंपरी विधानसभा मतदार संघाच्या निवडणूक कार्यालयातून आज दिवसभरा २५ व्यक्तींनी ४८ उमेदवारी अर्ज घेतली आहेत.

मंगळवारी (दि. २२) पिंपरी निवडणूक कार्यालयातून २९ जणांनी ५९ उमेदवारी अर्ज नेले आहेत. त्यामुळे पिंपरी निवडणूक कार्यालयातून विक्री झालेल्या उमेदवारी अर्जांची संख्या आता १०७ झाली आहे. त्यामुळे उमेदवारी अर्जांची विक्री ही पिंपरी विधानसभा मतदार संघात झाली आहे.



# ऑक्टोबरपासूनच पाणीटंचाईच्या झळा

## अत्यल्प पावसामुळे एक-दीड महिन्यांतच तीव्र पाणीटंचाईचे संकट निर्माण होईल, अशी भिती येथील ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील बहुतांश भागात मुसळधार पाऊस पडत असून काही ठिकाणी पूर ही आले आहेत. मात्र पुरंदरमधील वाल्हे गावांच्या पूर्व भागात पावसाचे प्रमाण अतिअल्प प्रमाणात असल्याने येथील वाड्या-वस्त्यांवर पुढील एक-दीड महिन्यांतच तीव्र पाणीटंचाईचे संकट निर्माण होईल, अशी भिती येथील ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.

वाल्हे गावाच्या पूर्वेकडील भागात असलेल्या वाड्या-वस्त्यांवरील वागदरवाडी ग्रामपंचायतीच्या हद्दीतील,पवारवाडी,झापाचीवाडी, भैरजीचीवाडी, मोरूजीचीवाडी, वडाचीवाडी, बाळाजिचीवाडी तसेच सुकलवाडी ग्रामपंचायत हद्दीत वाड्या-वस्त्यांवर तसेच वाल्हे ग्रामपंचायत हद्दीतील गायकवाडवाडी, अंबाजीचीवाडी, मुकदमवाडी, कमठवाडी, भुजबळ कामठवाडी, माळवाडी तसेच दौंडज ग्रामपंचायतीच्या हद्दीतील वाड्या-वस्त्या या भागात पावसाचे प्रमाण अत्यल्प असल्याने,जर पुढील काही दिवसांत मोठा पाऊस पडला नाही तर सद्यःस्थितील पाणी पुढील दीड-दोन महिन्यापर्यंतच टिकेल.

मात्र, यानंतर टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा सुरू करावा लागेल, अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

वाल्हे गावच्या पश्चिम दिशेस 10 किलोमीटर अंतरावर असलेले वीर धरण मागील दीड- दोन महिन्यांत भरून निरा नदी तुडूंब भरून वाहत आहे.मात्र, वाल्हे, दौंडज गाव तसेच परिसरातील अनेक गावांत समाधानकारक पाऊस पडला नसल्याने नदीकाठच्या परिसरात पाणीसाठा मुबलक प्रमाणात आहे. मात्र,परिसरातील 10 किलोमीटरच्या भागात अतिअल्प प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध असल्याने, मागील वर्षासारखीच पाणीटंचाईची पुनरावृत्ती उद्भवती की काय ? या विचाराने शेतकरीवर्ग चिंताग्रस्त होत आहेत. तालुक्यातील टंचाईची दाहकता कमी केली जाते. ऑक्टोबरअखेरच पाणीटंचाईच्या झळा बसत आहेत. गावोगावचे पाझर तलाव कोरडे पडले आहेत. तर विंधन विहिरी, पाणीपातळी कमालीची खालावली आहे. शेतकऱ्यांनी रब्बी पिकांची पेरणी केली आहे. मात्र, पावसाअभावी ही पिकेही धोक्यात आली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांत चिंतेचे वातावरण आहे



### उपलब्ध पाणीसाठ्याने गाठला तळ

» पुणे-पंढरपूर पालखी महामार्गावरील दौंडज खिंड परिसरात मागील दोन महिन्यापुर्वी रिमझीम पाऊसाने परिसरातील बंधारे भरून ओसंडून वाहत होते.मात्र, मागील काही दिवसांपासून पावसाने ओढ दिल्याने उपलब्ध पाणीसाठ्याने तळ गाठला असून यामुळे शेतकरीवर्गाची चिंता वाढू लागली आहे.

### गेल्यावर्षीची पुनरावृत्ती उद्भवणार?

» वाल्हे गावच्या पश्चिम दिशेस 10 किलोमीटर अंतरावर असलेले वीर धरण मागील दीड- दोन महिन्यांत भरून निरा नदी तुडूंब भरून वाहत आहे.मात्र, वाल्हे, दौंडज गाव तसेच परिसरातील अनेक गावांत समाधानकारक पाऊस पडला नसल्याने नदीकाठच्या परिसरात पाणीसाठा मुबलक प्रमाणात आहे.

### पिकांची लागवड करावी की नाही?

» या परिसरात रिमझीम पाऊसावर खरीप हंगामातील पिके चांगली आली होती. या पिकांची काढणी अंतिम टप्प्यात असून रब्बी हंगामातील पिकांची लागवड करावी की नाही ? अशा द्विधामस्थितीत शेतकरीवर्ग आहे.

# राजकीय कुटुंबे रंगली मतदारांच्या गोतावळ्यात

## दौंडमध्ये विधानसभा निवडणुकीत कमालीची चुरस होणार कुल- थोरात- पवार गटांची वाढदिवस, वर्षश्राद्धाला हजेरी

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सर्वात संवेदनशील विधानसभा मतदारसंघ असलेल्या दौंड विधानसभा निवडणुकीत कमालीची चुरस होणार आहे.

राज्यातील सत्तांतरानंतर दौंडचे पारडे हे महायुतीकडे झुकले होते. मात्र, लोकसभा निवडणुकीत दौंडच्या सूज्ञ मतदारांनी तुतारीला साथ दिली.

त्यामुळे विधानसभा निवडणुकीत आमदार राहुल कुल आणि रमेश थोरात यांच्यात लढत होणार असल्याची चिन्हे दिसत आहेत. सध्या कुल, थोरात, पवार गटांकडून मतदारांची मने जिंकण्यासाठी मतपेरणी सुरू झाली आहे. राजकारण्याची कुटुंबे रंगले मतदारराजांच्या गोतावळ्यात, असे चित्र दिसून येत आहे.

दौंड विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. लोकसभेतील पीछेहाटीचा फटका महायुतीला बसला होता. आमदार राहुल कुल यांचे प्राबल्य, माजी आमदार रमेश थोरात यांची ताकद असताना खासदार सुप्रिया सुळे यांना लीड मिळाले आहे. त्यामुळे महायुती सावध पाऊले टाकत आहेत.

भाजपच्या उमेदवार यादीत आमदार राहुल कुल यांचे नाव जाहीर केल्यानंतर कुल गटाला उत्साह आहे. आमदार कुल हे गावोगावी मतदारांशी संवाद साधत आहेत. तर महायुतीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे रमेश थोरात यांनी निवडणूक लढवणारच, असा सूर आळवळला आहे.

थोरात हे गेल्या दोन महिन्यांपासून मतदार, कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी पूर्ण केल्या आहेत. थोरात हे अपक्ष किंवा शरद पवार गटाकडून निवडणूक मैदानात उतरण्याची शक्यता आहे.

कार्यकर्त्यांच्या कोंडाळ्यात फिरणारे आता नेते थेट जनतेच्या दरबारात नको, तर सुख – दुःखात सहभागी होऊ लागले आहेत, भावनिकतेला हात घालत इच्छुकांनी सुख-दु:खाच्या ठिकाणे भेटी देत मतपेरणी करण्यास सुरुवात केल्याचे दिसून येत आहे.





### भावनिकतेतून मतपेरणी

» आपले जे कार्यकर्ते नाराज झाले. त्यांची आठवण उमेदवारांना झाली आहे. त्यांना संपर्क करून मध्यस्थीमार्फत चर्चेला बोलावून मनधरणी करण्याचा प्रयत्न सध्या दौंड तालुक्यात चालू आहे. नाराजी मागे मानपान, आर्थिक तसेच राजकीय कारणे आहेत. त्यामुळे नाराजी काढण्यात नाकीनऊ येणार हे निश्चित आहे. मतदारसंघात मतदार म्हणतोय की, नवरात्रीत पैठणी पोहोचली आहे. आता लवकरच दिवाळीसाठी घरोघरी गोड फराळ पोहोचणारच आहे. आतापर्यंत जे उमेदवार कधी भेटत नव्हते. ते मयत, दशक्रियेबरोबर आता लहान बाळाच्या वाढदिवसालाही हजेरी लावत हात मिळवण्याची संधी सोडत नाहीत. हा चर्चेचा विषय बनला आहे.